RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक ३(२)] बुधवार, जानेवारी १७, २०१८/पौष २७, शके १९३९ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक १३

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.—** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. . . . . . . . | पृष्ठे १-५ |

दिनांक १५ जानेवारी २०१८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“ महाराष्ट्र शासन राजपत्रात ”** दिनांक १७ जानेवारी २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

२०१७ चा महा. अध्या. ९. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१७ हा, दिनांक १३ जून २०१७ रोजी प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २४ जुलै २०१७ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ (सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१) हे महाराष्ट्र विधानसभेने दिनांक ८ ऑगस्ट २०१७ रोजी संमत केले होते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेकडे ते पारेषित करण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** त्यानंतर महाराष्ट्र विधानपरिषदेची दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेत उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्याचा कालावधी समाप्त झाल्यानंतर म्हणजेच दिनांक ३ सप्टेंबर २०१७ रोजी उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाला असता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ; आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जी मुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ रोजी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त पुढे चालू ठेवणे अध्यादेश" असा करण्यात आला आहे), प्रख्यापित केला होता ; २०१७ चा महा. अध्या. १७.

**आणि ज्याअर्थी,** उक्त पुढे चालू ठेवणे अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) अधिनियम, २०१७ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १३ जून २०१७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) मध्ये, खंड (र१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९६४ चा महा. २०.

" (र२) " राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण " याचा अर्थ, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३-कब अन्वये घटित करण्यात आलेले राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, असा आहे ; ". १९६१ चा महा. २४.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये,—

(क) खंड (अ) मधील,—

(एक) " जे जिल्हाधिकाऱ्याने किंवा, यथास्थिति, जिल्हा उप निबंधकाने याबाबतीत वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास एकवीस वर्षांहून कमी वयाचे नसतील " या मजकुराऐवजी, " जे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने, आवश्यकता भासल्यास, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा, यथास्थिति, जिल्हा उप निबंधकाच्या मदतीने याबाबतीत, वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास एकवीस वर्षांहून कमी वयाचे नसतील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (एक) आणि त्याचे परंतुक यांऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (एक) बाजार क्षेत्रात राहणाऱ्या पात्र मतदारांनी (ज्याने किमान १० आर इतकी जमीन धारण केली असेल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास ज्यांचे वय अठरा वर्षांहून कमी नसेल आणि ज्याने निवडणूक घोषित झाल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या पाच वर्षांमध्ये किमान तीन वेळा संबंधित बाजार समितीमध्ये आपल्या अधिसूचित कृषि उत्पन्नाची विक्री केली असेल असा शेतकरी असलेल्या) पंधरा सदस्य निवडून दिलेले असतील, (ज्यांपैकी दोन महिला असतील, एक इतर मागासवर्गातील व्यक्ती असेल, एक निरधिसूचीत जमातीतील (विमुक्त

जातीतील) किंवा भटक्या जमातीतील व्यक्ती असेल आणि एक अनुसूचित जातीतील किंवा अनुसूचित जमातीतील व्यक्ती असेल) :

परंतु, जर बाजार समिती ही आदिवासी क्षेत्रात स्थित असेल तर, निरधिसूचित जमातीतील (विमुक्त जातीतील) किंवा भटक्या जमातीतील व्यक्तीच्या जागी अनुसूचित जमातीतील एका व्यक्तीला उपरोक्त प्रमाणे निवडून देण्यात येईल. " ;

(तीन) उप-खंड (दोन) वगळण्यात येईल ;

(ख) खंड (क) व त्याचे परंतुक वगळण्यात येईल ;

(ग) खंड (ड) वगळण्यात येईल ;

(घ) खंड (इ) वगळण्यात येईल ;

(ङ) पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

२०१८ चा महा. १३०.

" परंतु, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) अधिनियम, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या पाच वर्षांच्या कालावधीकरिता अशा प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतनंतर घेण्यात येणाऱ्या कोणत्याही निवडणुकीमध्ये, ज्यांनी किमान १० आर इतकी जमीन धारण केली असेल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास ज्यांचे वय अठरा वर्षांहून कमी नसेल असे बाजार क्षेत्रात राहणारे सर्व शेतकरी अन्यथा मतदान करण्यास अपात्र नसतील तर, ते सर्व शेतकरी मतदान करण्यास पात्र असतील. " ;

(२) पोट-कलम (१-अ) वगळण्यात येईल ;

(३) पोट-कलम (१ब) मध्ये,—

(क) खंड (क) मध्ये,—

(एक) उप-खंड (एक) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (एक) विभागीय बाजार समितीच्या बाजार क्षेत्रात राहणाऱ्या पात्र मतदारांनी (ज्याने किमान १० आर इतकी जमीन धारण केली असेल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास ज्यांचे वय अठरा वर्षांहून कमी नसेल आणि ज्याने निवडणूक घोषित झाल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या पाच वर्षांमध्ये किमान तीन वेळा आपल्या अधिसूचित कृषि उत्पन्नाची विक्री केली असेल असा शेतकरी असलेल्या) निवडून दिलेले, शेतकऱ्यांचे पंधरा प्रतिनिधी (ज्यांपैकी एक महिला असेल, एक इतर मागासवर्गातील व्यक्ती असेल, एक निरधिसूचित जमातीतील (विमुक्त जातीतील) किंवा भटक्या जमातीतील व्यक्ती असेल आणि एक अनुसूचित जातीतील किंवा अनुसूचित जमातीतील व्यक्ती असेल) :

परंतु, जर विभागीय समिती ही आदिवासी क्षेत्रात स्थित असेल तर, निरधिसूचित जमातीतील (विमुक्त जातीतील) किंवा भटक्या जमातीतील व्यक्तीच्या जागी अनुसूचित जमातीतील एका व्यक्तीला उपरोक्त प्रमाणे निवडून देण्यात येईल. " ;

(दोन) उप-खंड (दोन) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (दोन) प्रादेशिक बाजार समितीच्या बाजार क्षेत्रात राहणाऱ्या पात्र मतदारांनी (ज्याने किमान १० आर इतकी जमीन धारण केली असेल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास ज्यांचे वय अठरा वर्षांहून कमी नसेल आणि ज्याने निवडणूक घोषित झाल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या पाच वर्षांमध्ये किमान तीन वेळा आपल्या अधिसूचित कृषि उत्पन्नाची विक्री केली असेल असा शेतकरी असलेल्या) निवडून दिलेले, शेतकऱ्यांचे पंधरा प्रतिनिधी (ज्यांपैकी एक महिला असेल, एक इतर मागासवर्गातील व्यक्ती असेल, एक

निरधिसूचित जमातीतील (विमुक्त जातीतील) किंवा भटक्या जमातीतील व्यक्ती असेल आणि एक अनुसूचित जातीतील किंवा अनुसूचित जमातीतील व्यक्ती असेल) :

परंतु, जर प्रादेशिक बाजार समिती ही आदिवासी क्षेत्रात स्थित असेल तर, निरधिसूचित जमातीतील (विमुक्त जातीतील) किंवा भटक्या जमातीतील व्यक्तीच्या जागी अनुसूचित जमातीतील एका व्यक्तीला उपरोक्त प्रमाणे निवडून देण्यात येईल ; आणि " ;

(तीन) उप-खंड (पाच) वगळण्यात येईल ;

(चार) उप-खंड (सहा) वगळण्यात येईल ;

(पाच) उप-खंड (सहा-अ) वगळण्यात येईल ;

(ख) खंड (ड) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ड) खंड (क) च्या उप-खंड (सात) खालील बाजार समितीची सदस्य असलेल्या एखाद्या व्यक्तीस, समितीच्या चर्चेत भाग घेण्याचा हक्क असेल परंतु तिच्या बैठकीमध्ये तिला मत देण्याचा हक्क असणार नाही. " .

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मध्ये,—

(१) पोट-कलम (२) वगळण्यात येईल ;

(२) पोट-कलम (४) मध्ये,—

(क) खंड (अ) मध्ये, " जिल्हाधिकारी किंवा, यथास्थिति, ज्याने निवडणुकांचे कामकाज चालविले तो जिल्हा उप निबंधक " या मजकुराऐवजी, " राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ब) मध्ये, " जिल्हाधिकारी किंवा, यथास्थिति, ज्याने निवडणुकांचे कामकाज चालविले तो जिल्हा उप निबंधक " या मजकुराऐवजी, " राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (क) मध्ये, " जिल्हाधिकारी किंवा, यथास्थिति, ज्याने निवडणुकांचे कामकाज चालविले तो जिल्हा उप निबंधक " या मजकुराऐवजी, " राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १४अ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४अ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मध्ये,—

(क) खंड (अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (अ) बाजार समित्यांच्या सर्व निवडणुकांसाठी मतदारांची यादी तयार करणे आणि अशा बाजार समित्यांच्या सर्व निवडणुकांचे कामकाज चालवणे या बाबींचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण हे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे निहित असेल; आणि " ;

(ख) खंड (ब) मध्ये,—

(एक) " ज्यांचे कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये फीच्या " या मजकुराने सुरू होणारा आणि " जिल्हाधिकाऱ्याकडे निहित असेल " या मजकुराने संपणारा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) " पाच टक्के " या मजकुराऐवजी, " दहा टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) " दहा हजार रूपये " या मजकुराऐवजी, " एक लाख रूपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (३) मध्ये," जिल्हाधिकारी किंवा, यथास्थिति, जिल्हा उप निबंधक " या मजकुराऐवजी, " राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण " हा मजकूर आणि " जिल्हाधिकाऱ्यास किंवा, यथास्थिति, जिल्हा उप निबंधकास " या मजकुराऐवजी, " राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (४) मध्ये, " जिल्हाधिकारी किंवा, यथास्थिति, जिल्हा उप निबंधक " या मजकुराऐवजी, " राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) पोट-कलम (५) मध्ये,—

(क) " जिल्हाधिकारी किंवा, यथास्थिति, जिल्हा उप निबंधक " या मजकुराऐवजी, " राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " जिल्हाधिकारी " या मजकुराऐवजी," राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(५) पोट-कलम (६) वगळण्यात येईल.

२०१७ चा महा. अध्या. १७.

सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ याचे निरसन व व्यावृत्ती.

**६.** (१) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१७ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.